# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## इ क्षेत्रीय कार्यालय

## सभावृत्तांत
(इ क्षेत्रीय समितीची मासिक सभा)

दिनांक : ०७/०९/२०१९ वेळ: सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे सप्टेंबर २०१९ ची मासिक सभा शनिवार दिनांक ०७/०९/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.बुर्डे सुवर्णा विकास | - | **अध्यक्षा** |
| २) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | - | सदस्य |
| ३) मा.गायकवाड निर्मला मनोज | - | सदस्या |
| ४) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी | - | सदस्य |
| ५) मा.बारसे प्रियांका प्रविण | - | सदस्या |
| ६) मा.फुगे भिमाबाई पोपट | - | सदस्या |
| ७) मा.साधना सचिन तापकीर | - | स्विकृत सदस्या |
| ८) मा.लांडे विजय नामदेव | - | स्विकृत सदस्य |

या शिवाय मा.श्रीनिवास रामचंद्र दांगट - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री.प्रविण घोडे – कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, मा.श्री.साळुंखे जे.जी.- मुख्याध्यापक मा.वि.भोसरी, मा.श्री.पी.आर.गायकवाड – मुख्याध्यापक लांडेवाडी विद्यालय, श्री.एस.व्ही.बगाडे-सहाय्यक उद्यान अधिक्षक, श्री.एस.डी. रावते-हॉर्टी. पर्यवेक्षक, श्री.राजेश नंदलाल भाट – सहा.आरोग्याधिकारी, श्री.बोरावके डी.एच.-उपअभियंता (स्थापत्य), श्री.वहीकर एस.एस.-उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.लांडे बी.पी. उपअभियंता विद्युत, श्री.कुलकर्णी रत्नाकर.-कनिष्ठ अभियंता पा.पु., श्री.व्ही.एम.ताकवले -क.अभियंता (स्थापत्य.), श्रीम.वृषाली पोतदार क.अभियंता (स्थापत्य), श्री.ए.व्ही.गुमास्ते-मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.गायकवाड पी.आर.- मुख्याध्यापक मा.विद्यालय लांडेवाडी, श्री.बी.टी. भाबड- क.अभियंता पर्यावरण, श्री.आर.व्ही. शिंदे- क.अभियंता स्थापत्य, श्री.एस.पी.चौधरी – सर्व्हेअर भू.जि.विभाग इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/ नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करून सभा सूरू करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात समाविष्ट करण्यात आले.

विषय क्रमांक १ मा.लक्ष्मण सोपान सस्ते यांचा प्रस्ताव
प्रभाग क्र.३ मोशी येथे भाजीमंडईचा विस्तार करणेकामी स्वच्छतागृह पाडणेबाबत.

विषय क्रमांक २ मा.विजय नामदेव लांडे यांचा प्रस्ताव
भोसरी उड्डाण पुलाखालील दिघी रोड चौकाचे नामकरण व सुशोभीकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ३ मा.लक्ष्मण सोपान सस्ते यांचा प्रस्ताव
मोशी येथील गट क्र.३७७ ते ३८८, ३८९, ३९०, ३९१, ३९६, ४२४ पर्यंतचा १२.०० मी.रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०५ अन्वये घोषित करणेबाबत.

विषय क्रमांक ४ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
मौजे च-होली बु, पठारे मळा येथील जुने स.नं. ३०३, ३०७, ३०४, ३०९, ३१०, ३११ ते ३१४ , १३३, १३४, १३६, १३७ या भागाचे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ५ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
मौजे च-होली बु, पठारे मळा येथील जुने स.नं. ३०४, ४५२, ३४७, ४०६, ३५३, ४०७ या भागाचे नामकरण करणे व फलक लावणेबाबत.

विषय क्रमांक ६ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
मौजे च-होली बु, पठारे मळा येथील जुने स.नं. २९२, २९३, ३५७, ३५८ यामधून जाणा-या ९० मीटर आणि ३० मीटर रस्ते मिळतात या ठिकाणाचे चौकाचे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ७ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
मौजे च-होली बु, पठारे मळा येथील जुने स.नं. ३६१ ते ३६४, ३८१ ते ३८४ या भागाचे नामकरण करणे व फलक लावणेबाबत.

विषय क्रमांक ८ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
मौजे दिघी भारतमाता नगर ते आळंदी रोड जोडणारा येथील गट नं. ७६/१, ७६/२ मधील रस्ता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेबाबत.

विषय क्रमांक ९ मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
मौजे दिघी येथील स.नं.७७ मधील उद्यान विभागाची मोडकळीस आलेली खोली पाडणेबाबत.

विषय क्रमांक १० मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचा प्रस्ताव
पुणे आळंदी रोड वरील वडमुखवाडी येथील चौकाचे व बसस्टॉपचे नामकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ११ मा. . सौ. हिराबाई (नानी) गोवर्धन घुले यांचा प्रस्ताव
बोपखेल येथे मुळा नदीच्या उत्तर बाजूकडील २४ मीटर रस्त्यापासून उत्तरेकडील १२.०० मीटर रुंद रस्त्यापर्यंत १२.०० मी. रस्त्याच्या पूर्वेकडील बाजूस ६.०० रुंद अतिरिक्त रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०५ नुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबत.

अ) दिनांक ०२/०८/२०१९ रोजी घेणेत आलेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ४) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १३ | विषय क्रमांक | : | ०१ |
| दिनांक | : | ०७/०९/२०१९ | विभाग | : | नगर रचना |
| सुचक | : | मा. नितीन लांडगे | अनुमोदक | : | मा.सोनाली गव्हाणे |

संदर्भ मा. नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे दिनांक ०७/०६/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे भोसरी येथील सर्व्हे नं. ६८१/३ सीटीएस नं. ३४०० मधून असणाऱ्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजूर विकास आराखड्यानुसार स्पॉट झोनिंग (औद्योगिक/ रहिवाशी) आहे. सदर स्पॉट झोनिंग मधील औद्योगिक व रहिवाशी नागरीकांसाठी दळणवळण तसेच औद्योगिक मालाची ने-आण करणेकामी सदर रस्त्याची तात्काळ आवश्यकता आहे. सदर रस्ता नकाशात अधोरेखित असून सदर रस्ता २०५ अन्वये विकसित झाल्यास महानगरपालिका व नागरिक आणि औद्योगिकरणाची अडचण दूर होणार आहे. सदर रस्ता उत्तरेपासून दक्षिणेकडे अर्धवट स्थितीत असल्याने २०५ अन्वये विकसित करणे क्रमपात्र होईल. त्यामुळे सदर रस्ता महानगरपालिका अधिनियम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १४ | विषय क्रमांक | : | ०२ |
| दिनांक | : | ०७/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. भिमाबाई फुगे | अनुमोदक | : | मा.निर्मला गायकवाड |

संदर्भ मा. लक्ष्मण सोपान सस्ते यांचे दिनांक ०७/०९/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

प्रभाग क्र.३ मोशी येथे भाजीमंडईचा विस्तार करणेचे काम चालू आहे. सदर ठिकाणी सध्या वापरातील/ अस्तित्वातील स्वच्छतागृह आहे. परंतु सदरचे स्वच्छतागृह पाडलेनंतरच भाजी मंडईचा विस्तार करता येणे शक्य आहे. त्यामुळे सदरचे शौचालय पाडणेस व बाजूस असलेल्या नाल्यामध्ये मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस आर्गनायझेशन यांचे मार्फत शौचालय बांधणेस व देखभाल दूरूस्तीसाठी "पैसे द्या व वापरा" या तत्वावर देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १५ | विषय क्रमांक | : | ०३ |
| दिनांक | : | ०७/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. विजय नामदेव लांडे | अनुमोदक | : | मा.सागर गवळी |

संदर्भ  मा. विजय नामदेव लांडे यांचे दिनांक ०७/०९/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

भोसरी दिघी रोड बंसल सिटीजवळ संत निराकारी मंडळाचे सत्संग भवन असून या भवनामध्ये पुन्याच्या विविध भागातून हजारो भाविक सत्संगासाठी येतात. या भावीकांना तसेच परिसरातील नागरीकांना पथदर्शक म्हणून भोसरी दिघी रोड उड्डाणपुलाखालील जो दिघीकडे जाणारा चौक आहे या चौकास **"संत निरंकारी बाबा हरदेव सिंग जी महाराज चौक"** असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १६ | विषय क्रमांक | : | ०४ |
| दिनांक | : | ०७/०९/२०१९ | विभाग | : | नगर रचना |
| सुचक | : | मा. सागर गवळी | अनुमोदक | : | मा.निर्मला गायकवाड |

संदर्भ  मा. लक्ष्मण सोपान सस्ते यांचे दिनांक ०७/०९/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मोशी येथील गट क्र.३७७ ते ३८८, ३८९, ३९०, ३९१, ३९६, ४२४ मधील रस्ता, या भागात फार मोठ्या प्रमाणात रहिवाशी राहत असून वसाहतीमधील नागरीकास वाहतुकीकरीता १२.०० मीटर रस्त्याची आवश्यकता आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा विषय नगररचना विभागामार्फत मा.शहरसुधारणा समितीपुढे मान्यतेकामी ठेवण्यात यावा. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाबाबत पुढील कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १७ | विषय क्रमांक | : | ०५ |
| दिनांक | : | ०७/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. भिमाबाई फुगे | अनुमोदक | : | मा.निर्मला गायकवाड |

संदर्भ  मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०७/०९/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे च-होली बु, पठारे मळा येथील जुने स.नं. ३०३, ३०७, ३०४, ३०९, ३१०, ३११ ते ३१४ , १३३, १३४, १३६, १३७ या भागास **पठारे नगर** असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १८ | विषय क्रमांक | : | ०६ |
| दिनांक | : | ०७/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. भिमाबाई फुगे | अनुमोदक | : | मा.निर्मला गायकवाड |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०७/०९/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे च-होली बु, पठारे मळा येथील जुने स.नं. ३०४, ४५२, ३४७, ४०६, ३५३, ४०७ या भागास **पठारे पार्क** असे नामकरण करणेस तसेच सदर भागात पठारे पार्क १ ते ४ चे नामफलक लावणेत मान्यता देण्यात देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | १९ | विषय क्रमांक | : | ०७ |
| दिनांक | : | ०७/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. भिमाबाई फुगे | अनुमोदक | : | मा.निर्मला गायकवाड |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०७/०९/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे च-होली बु, पठारे मळा येथील जुने स.नं. २९२, २९३, ३५७, ३५८ यमधून जाणा-या ९० मीटर आणि ३० मीटर रस्ते मिळतात या ठिकाणचे चौकास **पठारे चौक** असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | २० | विषय क्रमांक | : | ०८ |
| दिनांक | : | ०७/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. भिमाबाई फुगे | अनुमोदक | : | मा.निर्मला गायकवाड |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०७/०९/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे च-होली बु, पठारे मळा येथील जुने स.नं. ३६१ ते ३६४, ३८१ ते ३८४ या भागास **पठारे फार्म** असे नामकरणे करणेस तसेच सदर भागात पठारे फार्म १ ते ३ चे नामफलक लावणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | २१ | विषय क्रमांक | : | ०९ |
| दिनांक | : | ०७/०९/२०१९ | विभाग | : | नगर रचना |
| सुचक | : | मा. सागर गवळी | अनुमोदक | : | मा. लक्ष्मण सस्ते |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०७/०९/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे दिघी भारतमाता नगर ते आळंदी रोड जोडणारा येथील गट नं. ७६/१, ७६/२ मधील रस्ता, या भागात फार मोठ्या प्रमाणात रहिवाशी राहत असून वसाहतीमधील नागरीकांना वाहतुकीकरीता ९.०० मीटर रूंदीच्या रस्त्याची आवश्यकता आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा विषय नगररचना विभागामार्फत मा.शहरसुधारणा समितीपुढे मान्यतेकामी ठेवण्यात यावा. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाबाबत पुढील कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | २२ | विषय क्रमांक | : | १० |
| दिनांक | : | ०७/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. निर्मला गायकवाड | अनुमोदक | : | मा. भिमाबाई फुगे |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०७/०९/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे दिघी येथील सर्व्हे नं. ७७ मधील उद्यान विभागाचे ताब्यात असलेली मनपाची खोली मोळकडीस आलेली असून धोकादायक आहे. सदरची खोली पाडणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठरावानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | २३ | विषय क्रमांक | : | ११ |
| दिनांक | : | ०७/०९/२०१९ | विभाग | : | स्थापत्य |
| सुचक | : | मा. सुवर्णा बुर्डे | अनुमोदक | : | मा. भिमाबाई फुगे |

संदर्भ मा. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०७/०९/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

पुणे आळंदी रोड वरील वडमुखवाडी येथील चौकाला **श्री पद्मावती माता चौक वडमुखवाडी** असे नामकरण करण्यात यावे, सदरचे ठिकाणी असलेल्या बस स्टॉपला **आंबा बस स्टॉप वडमुखवाडी** हे नाव देण्यात येवुन मनपाचा अधिकृत फलक लावणेत यावा, अशी मागणी वडमुखवाडी येथील ग्रामस्थांचे वतीने श्री अनिकेत सिध्देश्वर तापकीर व श्री.विजय राजाराम तापकीर यांनी केलेली आहे त्यानुसार सदर प्रमाणे चौकाचे व बसस्टॉपचे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | २३ | विषय क्रमांक | : | १२ |
| दिनांक | : | ०७/०९/२०१९ | विभाग | : | नगररचना |
| सुचक | : | मा. | अनुमोदक | : | मा. सागर गवळी |

संदर्भ मा. सौ. हिराबाई (नानी) गोवर्धन घुले यांचे दिनांक ०७/०९/२०१९ रोजीचे पत्र
मा.प्रभाग अध्यक्षा यांनी शिफारस केले प्रमाणे

बोपखेल येथे मुळा नदीवर पुल बांधणेचे काम करण्यात येत आहे. हा पुल बोपखेल येथील पिंपरी चिंचवड मनपाच्या विकास आराखड्यात १२.०० मीटर रस्तयावर उततर आहे. पुलाच्या दोन्ही बाजूकडील मिळकत धारकांना पुरेसा सेवा रस्ता उपलब्ध होणार नाही. त्यामुळे नागरीकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीच्या उत्तर बाजूकडील २४ मीटर रस्त्यापासून उत्तरेकडील १२.०० मीटर रुंद रस्त्यापर्यंत १२.०० मी. रस्त्याच्या पूर्वेकडील बाजूस ६.०० रुंद अतिरिक्त रस्ता म्हणजेच १२.०० मी. + ६.०० मी. एकुण १८.०० मी. रस्ता आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०५ नुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे. सदरचा विषय पुढील कार्यवाहीकामी नगररचना विभागाकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(सुवर्णा बुर्डे)
अध्यक्षा, इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/ १/कावि/ ३६८ /२०१९
दिनांक : २४ /०९ /२०१९

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
सभावृत्तांतातील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.**

मा.सुवर्णा बुर्डे -
- ज्या जागांचा ताबा मिळालेला आहे तेथील रस्त्यांची कामे सूरू करण्यात यावीत.
- पिण्याचे पाणी सोडण्याची वेळ निश्चित नसल्याने महिलांना त्रास होत असून माझेकडे तक्रार करीत आहेत. पाण्याची वेळ निश्चित करण्यात यावी.
- रात्री १२ वा.नंतरची वेळ बंद करावी, दिवसा कोणतीही वेळ चालेल, रात्री १२ पूर्वी कोणतीही वेळ निश्चित केली तरी चालेल.
- पाणी आले की विद्युत पुरवठा बंद होतो. सणासुदीचे दिवस असलेने पाणी मिळणे खूप गरजेचे आहे.
- रस्ता दूरूस्तीची कामे झालेली नाहीत, अधिकारी याबाबत पाहणी करीत नाहीत. २४ बाय ७ अंतर्गत रस्ते खोदाई नंतर फक्त खडी टाकलेली आहे, डांबरीकरण झालेले नाही.
- काही ठिकाणी चेंबरची झाकणे नाहीत, जेथे बदलली आहेत त्या ठिकाणीची जुनी झाकणे जागेवरच पडून आहेत.
- विद्युत विषयक कामे झालेनंतर सदरचे रस्त्यावर डांबर टाकले जात नाही. संबंधित अधिकाऱ्यांमध्ये समन्वय दिसून येत नाही. रस्ते खोदाई करून विद्युत विषयक कामे पुर्ण झाल्यानंतर रस्त्याची दूरूस्ती वेळेवर होणे आवश्यक आहे.
- रस्त्यावर आलेल्या फांद्या तोडण्यास उद्यान विभागाचे कर्मचारी नकार देतात. रामनगरीमध्ये रत्यावर आलेल्या फांदीमुळे गाडीच्या काचा फुटण्याची घटना घडलेल्या आहेत.
- कर्मचारी कमी असलेस वाढीव कर्मचारी मागून घ्यावेत व कामे वेळेवर करण्यात यावीत.
- पाणीपुरवठा, जलनि:सारण या आवश्यक बाबी आहेत.

मा.सागर गवळी -
- गणेश विसर्जन सुरु झालेले आहे, आरोग्य विभागाने मिरवणूकीत अडथळा करणाऱ्या रस्त्यावरील झाडच्या फांद्यांची तातडीने छाटणी करून घ्यावी. सर्व मार्गांची पाहणी करून घ्यावी.
- पाणीपुरवठा लाईनचे वॉल लिकेज झालेले असून पाणी वाया जात आहे. तसेच पाण्यामुळे रस्त्यावर घसरण होऊन गाडया स्लीप होत आहेत. त्याची पाहणी करुन दूरूस्त करणेत यावेत.
- उपअभियंता यांनी पाणी सोडण्याचे नियोजन करावे.
- लिकेज कोठे आहे यांची माहिती घेतलेली नाही. पाणी लिकेज होऊन रस्त्यावर आलेने अपघात झालेले आहेत.
- काही भागात अजिबात पाणी येत नाही, तर काही भागात खूप पाणी येते.
- पाणी रात्री अपरात्री येते, वेळ निश्चित नाही.
- दोन उपअभियंता यांनी अर्धा-अर्धा प्रभागात नियोजन करावे.

मा.निर्मला गायकवाड -
- प्रभागातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून घ्यावीत.
- गजानन महाराज नगर, गोकुल कॉलनी या भागात दोन महिन्यापासून घाण पाणी येत असलेची तक्रार आहे. त्याबाबत अद्याप कार्यवाही झालेली नाही.
- दिघी मध्ये कचरा गाड्या वेळेवर येत नाहीत, झाडू मारला जात नाही, रस्त्यावर कचरा पडून आहे.

उपअभियंता ज.नि. -
- सदरचे भागात मोठी लाईन टाकण्याचे काम लवकरात लवकर करून घेण्यात येणार आहे. कोठे अडचणी आहेत याची पाहणी करणे चालू आहे.

मा.भिमाबाई फुगे -
- झाडू मारून रस्त्याचे कडेला लावलेला कचरा वेळेवर उचलला जात नाही. त्यामुळे कचरा इतरत्र पसरला जातो. याबाबत प्रभाग क्र. ५ मध्ये पाहणी करण्यात यावी.
- गाडी येवून लवकरच निघून जाते.
- स्थापत्य विभागाने काम केलेला राडारोडा रस्त्यावरच पडून आहे. तो उचलण्यात यावा.
- राधानगरी मध्ये झाड तोडण्यासाठी २ महिण्यापूर्वी पत्र दिले आहे. तसेच दोन वेळा याबाबत पुनश्च पत्रे दिलेली आहेत परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही. विद्युत खांबाजवळच झाड आहे.

मा.साधना तापकीर -
- रामेश्वरनगर मध्ये पाणी येत नाही म्हणून महिला तक्रार करीत आहेत. रत्याची कामे झालेली नाहीत. रस्ता सर्वत्र खराब झालेला आहे.
- गंधर्व नगरीमध्ये खडी टाकण्यात आलेली नाही.